लोकसेवा मंडळ,नरवेल द्वारा संचालीत
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती संलग्नित

# दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय

मलकापूर,जि.बुलडाणा

Website-www.ddnc.in
Email ID-ddnc.sw.c.mlk@gmail.com

अनुदानित

महा. सांकेतांक क्र.-३२८ पत्ता - मुक्ताईनगर रोड,मलकापूर-४४३१०१ पो.बॉ.नं.३५, दुरभाष-(०७२६७)-२९५०५९

जा.क्र. : दा.ध.ना.चौ./सकाम/ 269/२० 22

दिनांक : / /२० 18 AUG 2022

प्रति,
मा. समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

विषय :- हर घर तिरंगा कार्यक्रमाचा अहवाल पाठविणे बाबत.
संदर्भ :- क्र. संगाबअवि/रासेयो/१७/३०२/२०२२ दि. ०४/०७/२०२२.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये, आमच्या महाविद्यालयात दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम अंतर्गत केलेल्या कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल आपणाकडे पाठवित आहोत. कृपया स्विकार करण्यात यावा. ही नम्र विनंती.

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य
महाविद्यालय,मलकापूर,जि.बुलडाणा.

सोबत : १) कार्यक्रम अहवाल.
२) कार्यक्रमाचे फोटो.

लोकसेवा मंडळ नरवेल द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित

दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय मलकापूर जि. बुलडाणा

राष्ट्रीय सेवा योजना

सत्र - २०२२ - २०२३

# "हर घर तिरंगा" उपक्रमाचा अहवाल

दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्याचा अहवाल खालीलप्रमाणे:-

१} सोमवार दिनांक ०८/०८/२०२२ रोजी महाविद्यालयात हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रसिंह दिक्षित सर होते व प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.देविदास दरेगावे उपस्थित होते.सर्वप्रथम प्रा.देविदास दरेगावे यांनी १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान हर घर तिरंगा उपक्रम राबविण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली यामध्ये तिरंगा ध्वज कसा लावावा कोणत्या दिशेने लावावा कधी लावण्यात यावा याविषयी सखोल माहिती दिली. तसेच प्राचार्य राजेंद्रसिंह दिक्षित सरांनी आपली भाषणात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा अभियानात सामील व्हावे तसेच घरोघरी तिरंगा ध्वज लावत असताना शासनाने व विद्यापीठाने दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करावे. व तिरंगा ध्वज लाण्यासाठी विद्यार्थ्यांनी इतरांना मदत करण्याचे आव्हान करून कार्यक्रमास उपस्थित सर्वांना स्वतंत्र्य अमृतमहोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

२} दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१०/८/२०२२ वार-बुधवार रोजी स.१०:०० वा. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा अभियान तसेच वीर शहीद व थोर स्वातंत्र्य सैनिक यांच्या स्मरनार्थ जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात मलकापूर शहरातील तहसील चौकातून करण्यात आली रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा अभियानाविषयी तसेच वीर शहिद व थोर स्वातंत्र्य सैनिकांनी देशसेवेसाठी केलेल्या महान कार्याच्या स्मरणार्थ विविध जयघोषाच्या माध्यमातून लोकांमध्ये

जनजागृती केली. या जनजागृती रॅलीचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रसिंह दिक्षित सर व मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक मा. बोराडे साहेब यांच्या हस्ते वीर शहीद संजयसिंह राजपूत यांच्या समाधी स्थळावर पुष्पचक्र अर्पण करून करण्यात आला. सदर जनजागृती रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य,राजेंद्रसिंह दिक्षित सर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.देविदास देरगावे तसेच प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

३} शनिवार दि.१३/०८/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी व प्राध्यापक वृंद,शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज लाऊन स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला तसेच रासेयो स्वयंसेवकांनी आपापल्या गावात तीरंगाध्वज लावण्यास इतरांना मदत केली.शेवटी १५ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयाचे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सूर्यास्तापूर्वी सायंकाळी.५:३० वाजता सन्मानपूर्वक तिरंगा ध्वज उतरविला.

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य
महाविद्यालय,मलकापूर,जि.बुलडाणा.